# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ४३८/२०२४ दिनांक-१९/११/२०२४.

## “मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ पोलीस बंदोबस्त व तयारी ”

भारत निवडणुक आयोगाने महाराष्ट्र सार्वत्रिक विधानसभा निवडणुक-२०२४ कार्यक्रम जाहिर केलेला असुन दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे. दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान व दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होणार आहे. मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालय हे पालघर व ठाणे जिल्हा या दोन लोकसभा मतदार संघाने विभाजीत असुन त्यात एकुण पाच विधानसभा मतदार संघ आहेत.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये पालघर जिल्हात १३१-बोईसर, १३२-नालासोपारा, १३३-वसई व ठाणे जिल्हयात १४५-मिरा भाईंदर, १४६-ओवळा माजिवाडा असे एकुण पाच विधानसभा मतदार संघ येतात. पाच विधानसभा मतदार संघात ४४९ इमारतीत १७७६ बुथ येथे मतदान प्रक्रिया होणार आहे. पोलीस आयुक्तालयात कार्यक्षेत्रात ०५ पोलीस उप आयुक्त, १२ सहाय्यक पोलीस आयुक्त, ३८६ पोलीस अधिकारी, २८४० पोलीस अंमलदार, ८७ पोलीस सेक्टर व पेट्रोलींग, १२५० होमगार्ड, **CISF/SAP** च्या ०५ कंपनी, **SRPF** ची ०१ कंपनी व ८८ नागरी संरक्षण स्वयंसेवक असा पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. तसेच पोलीस आयुक्तालय कार्यालय येथे पोलीस आयुक्त यांचे राखिव ०३ स्ट्रायकिंग व परिमंडळ २ व ३ कार्यालय येथे प्रत्येकी ०१ स्ट्रायकिंग नेमण्यात आलेली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात निवडणुक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्याच्या उद्देशाने मनाई

आदेश जारी करण्यात आलेले आहेत. तसेच योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

मागील निवडणुकीदरम्यान गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तींवर योग्य ती कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच शहरामध्ये सामाजिक माध्यमातुन संदेश प्रसारित (व्हायरल) होवुन समाजात तेढ निर्माण होणार नाही यासाठी सायबर सेलची पथक तैनात करण्यात आली आहे. निवडणुकीदरम्यान एखादा अनुचित किंवा संशयीत प्रकार नागरिकांचे लक्षात आल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयाचे नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२२-३५००६१३०, २९४५२१३५ व ७०२१९९५३५२ या क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

---------00000---------